महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/२०२२/ 224
दिनांक : १२/०१/२०२२ 12 JAN 2022

प्रति,

प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग पुणे)

**विषय : अकृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये,अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थांमधील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत..**

संदर्भ : १. शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.०६/विशि-३ दि.०७.०१.२०२२
२. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०२२/१३ दि.११/०१/ २०२२
३. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.१७/एनजीपी/[illegible]/लसीकरण/२०२२/१८ दि.०४/०१/ २०२२

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत कळविण्यात येते की, कोव्हिड १९ च्या संभावित तिसऱ्या लाटेमुळे राज्यामध्ये बाधित रुग्णांची संख्या मोठया प्रमाणावर वाढत असून ओमायक्रॉन या नव्या व्हेरियंटमुळे बाधित रुग्णांची संख्यासुध्दा मोठया प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे शासनाने सार्वजनिक ठिकाणांवर वावरण्यास प्रतिबंध लावले आहेत. या पार्श्वभूमीवर संदर्भाधीन शासन परिपत्रकानुसार राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहायित विद्यापीठे, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांतील वर्ग प्रत्यक्ष ऑफलाईन पध्दतीने न घेता दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ पर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने सुरु ठेवण्याबाबत सविस्तर सुचना निर्गमित केल्या आहेत.

संदर्भ क्र.०१ च्या शासन परिपत्रकातील सर्व सुचना आपल्या अधिनस्त असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणाव्यात व त्यानुसार कार्यवाही करण्याचे कळविण्यात यावे. तसेच सदर परिपत्रकातील अनुक्रमांक ६ मध्ये दिलेल्या सुचनांनुसार तंत्रनिकेतनांमधील लसीकरण करावयाच्या विद्यार्थ्यांची यादी स्थानिक प्राधिकरणांना उपलब्ध करुन दयावी व विशेष मोहिमेव्दारे लसीकरण पूर्ण करण्याबाबत कार्यवाही प्राधान्याने करावी.

संदर्भिय पत्रे सोबत जोडण्यात आले आहे पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित करणेत येत आहे.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- १. प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२२/९३

दिनांक : 11 JAN 2022

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- अकृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थांमधील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत...

संदर्भ : शासन परिपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०२१/ प्र.क्र.०६/बिशि-३, दिनांक ७.१.२०२२

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, कोव्हिड १९ च्या संभावित तिस-या लाटेमुळे राज्यामध्ये बाधित रुग्णांची संख्या मोठया प्रमाणावर वाढत असून ओमायक्रॉन या नव्या व्हेरियंटमुळे बाधित रुग्णांची संख्यासुध्दा मोठया प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे शासनाने सार्वजनिक ठिकाणांवर वावरण्यास प्रतिबंध लावले आहेत. या पार्श्वभूमीवर संदर्भाधीन शासन परिपत्रकानुसार राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे,अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील वर्ग प्रत्यक्ष ऑफलाईन पध्दतीने न घेता दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ पर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने सुरु ठेवण्याबाबत सविस्तर सुचना निर्गमित केल्या आहेत. (सोबत परिपत्रक जोडले आहे.)

सदर शासन परिपत्रकातील सर्व सुचना आपल्या अधिनस्त सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणाव्यात व त्यानुसार कार्यवाही करण्याचे कळविण्यात यावे. तसेच सदर परिपत्रकात अनुक्रमांक ६ मध्ये दिलेल्या सुचनांनुसार तंत्रनिकेतनांमधील लसीकरण करावयाच्या विद्यार्थ्यांची यादी स्थानिक प्राधिकरणांना उपलब्ध करुन दयावी व विशेष मोहिमेद्वारे लसीकरण पूर्ण करण्याबाबत कार्यवाही प्राधान्याने करावी.

पुणे.
11 JAN 2022
आवक क्र. ७५९

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,बांद्रा ,मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नीत महाविद्यालयांमध्ये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थांमधील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन परिपत्रक, क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०६/विशि-३,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दि. ७ जानेवारी, २०२२.**

**वाचा:-** उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र. ०६/विशि-३, दि. १३ ऑक्टोबर, २०२१.

**प्रस्तावना :-**

शासन परिपत्रक दि. १३ ऑक्टोबर, २०२१ अन्वये नियमित वर्ग सुरु करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, कोव्हिड-१९ च्या संभावित तिसऱ्या लाटेमुळे राज्यामध्ये बाधित रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असून ओमायक्रॉन या नव्या व्हेरियंटमुळे बाधित रुग्णांची संख्यासुध्दा मोठ्या प्रमाणावर दिवसेंदिवस वाढत आहे. शासनाने दि. २४/१२/२०२१ व ३०/१२/२०२१ च्या आदेशान्वये सार्वजनिक ठिकाणांवर वावरण्यास प्रतिबंध लावले आहेत. या पार्श्वभूमीवर दि. ०४ जानेवारी, २०२२ रोजी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडीओ कॉन्फरंसिंगद्वारे झालेल्या बैठकीमध्ये सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु, सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, अतिरिक्त आयुक्त-मुंबई महानगरपालिका यांच्यासमवेत विद्यापीठे व महाविद्यालयातील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेणे, त्याचप्रमाणे वसतीगृहे/लसीकरणासंदर्भात चर्चा झाली. वेगाने वाढत असलेल्या कोव्हिड-१९ व ओमायक्रॉनच्या रुग्णांची संख्या पाहता समुहसंसर्गाचा धोका टाळण्यासाठी व रोगाचा फैलाव रोखण्यासाठी विद्यापीठे व महाविद्यालयातील वर्ग तसेच इतर बाबींसंदर्भात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

शासन परिपत्रक, दि. १३ ऑक्टोबर, २०२१ अधिक्रमित करण्यात येत असून उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील वर्ग प्रत्यक्ष ऑफलाईन पध्दतीने न घेता दि. १५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत फक्त ऑनलाईन पध्दतीने सुरु ठेवण्यात यावेत.
२) सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, तंत्रनिकेतन तसेच विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात यावी.

विजेची अनुपलब्धता किंवा नेटवर्क कनेक्टीविटी नसल्यामुळे किंवा विद्यार्थी अथवा त्याचे कुटुंबीय कोरोना बाधित असल्यास किंवा आरोग्यविषयक इतर समस्यांमुळे विद्यार्थी परीक्षा देऊ शकला नाही तर अशा विद्यार्थ्यांची ऑनलाईन पध्दतीने पुनर्परीक्षा घेण्यात यावी. परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित काही भागात तसेच कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव विद्यापीठाशी व नांदेड विद्यापीठाशी संलग्नित काही भागात नेटवर्कींग सेवा विस्कळीत असल्यास किंवा उपलब्ध नसल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन ऑफलाईन स्वरुपात या भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात याव्यात.

३) परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना येणाऱ्या संभाव्य अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी विद्यापीठे/महाविद्यालयांनी हेल्पलाईनची व्यवस्था करावी. परीक्षा व्यवस्थितरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी त्यांच्या संकेतस्थळावर परीक्षांचा अभ्यासक्रम, नमुना प्रश्नसंच, हेल्पलाईन नंबर इ. स्वयंस्पष्ट माहिती उपलब्ध करुन द्यावी.

४) सर्व विद्यापीठे तसेच महाविद्यालयाशी निगडित वसतीगृहात राहत असलेल्या विद्यार्थ्यांना पुर्वसूचना व कालावधी देऊन ही वसतीगृहे बंद करण्यात यावीत. फक्त परदेशी विद्यार्थी, प्रयोगशाळांमध्ये संशोधन करीत असलेले विद्यार्थी तसेच पीएचडीचे विद्यार्थी यांना वसतीगृहात राहण्याची परवानगी देण्यात यावी. केंद्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्था जसे- आयआयटी, आयआयएम इ. येथील वसतीगृहांबाबतचा निर्णय त्या त्या ठिकाणची परिस्थिती पाहून संबंधित संस्थांच्या संचालकांनी घ्यावा. या विद्यार्थ्यांना संसर्ग होणार नाही याबाबत विद्यापीठ व महाविद्यालय प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घ्यावी. स्थानिक प्राधिकरणांना कोविड केअर सेंटर म्हणून वसतीगृहांची आवश्यकता असल्यास ती उपलब्ध करुन देण्यात यावीत.

५) विद्यापीठे तसेच महाविद्यालयांनी अद्याप लसीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांची यादी स्थानिक प्राधिकरणांना देऊन लसीकरणासाठी विशेष मोहिम राबवून तसेच विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करून तातडीने लसीकरण पूर्ण करुन घ्यावे.

६) तंत्रनिकेतनामधील विद्यार्थी १५ ते १८ या वयोगटातील असल्याने व या वयोगटातील व्यक्तींचे लसीकरण सुरु झाले असल्याने संचालक (तंत्र शिक्षण) यांनी लसीकरण करावयाच्या विद्यार्थ्यांची यादी स्थानिक प्राधिकरणांना उपलब्ध करुन द्यावी व विशेष मोहिमेद्वारे लसीकरण पूर्ण करण्यात यावे.

७) संचालक (कला) यांनी कला विषयाबाबतच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यासाठी परीक्षेचे / प्रश्नपत्रिकेचे स्वरुप निश्चित करावे.

८) ज्या शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण झालेले नाही त्यांचा तपशिल संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना उपलब्ध करुन देऊन व संबंधित प्राधिकरणांशी संपर्क साधुन विशेष मोहिम राबवून लसीकरण पूर्ण करुन घेण्यात यावे.

९) सार्वजनिक विद्यापीठे तसेच त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयीन शिक्षकीय / शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती ५०% करण्यात येऊन चक्राकार पध्दतीने त्यांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत व वर्क फ्रॉम होम बाबत विद्यापीठाने नियोजन करावे.

१०) १५ फेब्रुवारी, २०२२ नंतर परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्देश देण्यात येतील.

सदरहू शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२२०१०७१७३४५३०२०८ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

(अजित म. बाविस्कर)
उप सचिव

प्रत -

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. मा. गृहमंत्री यांचे प्रधान सचिव.
४. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. सर्व महानगरपालिका आयुक्त.
७. कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे.
८. कुलगुरू, सर्व अभिमत विद्यापीठे.
९. कुलगुरू, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
१०.जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
११.संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
१२.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
१३.कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
१४.मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
१५.मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
१६.निवड नस्ती.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/मरातंशिमं/लसीकरण/२०२२/ ९० दिनांक : 4 JAN 2022

प्रति,
संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय: कोविड-१९ लसीकरणासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्याबाबत...
संदर्भ: मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४.१.२०२२ रोजी आयोजित आढावा बैठक.

राज्यामध्ये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लसीकरण मोहिम सुरु आहे. अलीकडेच भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय यांनी वय वर्ष १५ ते १८ वयोगटातील मुलांच्या कोविड-१९ च्या लसीकरणाबाबतची मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात देखील वय वर्ष १५ ते १८ वयोगटातील मुलांचे लसीकरण दिनांक ३.१.२०२२ पासुन सुरु झालेले आहे. दिनांक ४.१.२०२२ रोजी मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी, सर्व कुलगुरु यांच्या समवेत कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर महाविद्यालयातील शैक्षणिक कामकाज, परिक्षा नियोजन, लसीकरण इ. बाबत आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये मा. मंत्री महोदय यांनी लसीकरणासाठी पात्र असलेल्या पदविका संस्थांमधील सर्व विद्यार्थ्यांचे (वय वर्ष १५ ते १८, तसेच १८ वर्षावरील) लसीकरण लवकरात लवकर पुर्ण करुन घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नीत/समकक्षीत पदविका संस्थांमध्ये, शिक्षण घेत असलेल्या व लसीकरणासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची (वय वर्ष १५ ते १८, तसेच १८ वर्षावरील) माहिती संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी. तसेच उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांनी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचेशी संपर्क साधुन व समन्वय राखून पात्र विद्यार्थ्यांचे लसीकरण लवकरात लवकर पुर्ण करुन घेण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या संचालनालयास सादर करावा.

पुणे.
10 JAN 2022
आवक क्र. ३८०

(डॉ. अभय [illegible])
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.
१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/नाशिक/ पुणे
२. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद